

सितारा आणि ऋषी कपूर



प्रेम चोप्रा - राज कपूर



रमेश सिप्पी - सुभाष घई



*मशाल*मध्ये सईद जाफरी - दिलीपकुमारची रंगीत जुगलबंदी

साधारणपणे सत्तरच्या दशकात बॉक्स ऑफिसचे सगळे रेकॉर्ड्स तोडणारा रमेश सिप्पींचा *शोले* प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाच्या निर्मितीमागचे अनेक रंजक किस्से आजही चवीने सांगितले आणि ऐकले जातात. *द मेकिंग ऑफ शोले*मध्ये ते वाचायला मिळतात. फोटोग्राफर, लाईटमॅन, नृत्यदिग्दर्शक, आणि सहकलाकार म्हणे धर्मेंद्रचा शब्द झेलायला आसुसलेले असायचे. धर्मेंद्रने त्यांना वश केलं होतं असंही म्हटलं जातं. यामागचा हेतू होता त्याचे हेमाशी असलेले प्रेमसंबंध. आणि याच चित्रपटात धर्मेंद्र-हेमावर एक गीत चित्रित करण्यात आलं होतं. त्याचे बोल होते:

चलो सहेली चलो रे साथी
होली के दिन दिल खिल जाते है
रंगों में रंग मिल जाते हैं...

चित्रीकरणाच्या दिवसांत होळीचा सण नव्हता. तरीही मनं मात्र खरोखरच खुलली होती, हेमा-धर्मेंद्रची. त्यामुळे धर्मेंद्रच्या इशाऱ्यावर काही दृश्यांचे रिटेक व्हायचे. आपल्या मिश्कील स्वभावानुसार तो सेटवर सगळ्यांना खूश ठेवायचा. अमिताभला या वारंवार रिटेक्स घेण्यामागचं कारण माहीत होतं. पण त्यालाही धर्मेंद्रच्या प्रेमाचा रंग लागला असावा. चहूकडे जणू प्रेमाची धुंदी होती. त्यातच रमेश सिप्पींनी आर.डी.बर्मनना सेटवर बोलावून घेतलेलं. त्यांनाही हे टेक-रिटेकचं रहस्य समजलं. आणि जसजसं गीत आकारू लागलं तसतसं हेमा-धर्मेंद्रचं प्रेम बहरू लागलं.

हिंदी चित्रपटसृष्टीने होळीचा सण नेहमीच मोठ्या उत्साहाने साजरा केला आणि पडद्यावरही रंगवला. चित्रपटाचं कथानक सामाजिक असो, राजकीय असो, हाणामारी असो नाहीतर प्रणयकथा असो, त्यात होळीचं गीत आलं की रंगांचा उत्सव हा ओघाने आलाच. आपल्याकडे या सणाचं स्वरूप नेहमीच सर्वधर्मीय-सर्वप्रांतीय झालं आहे.

होळीवर अनेक लोकप्रिय गीतं लिहिली गेली. *शोले*मधल्या याच गीतात अमिताभ-जयाचं प्रेम सूचक नजरांमधून दाखवायचं होतं. कारण यात जया संजीवकुमारची विधवा सून असते. पण भूमिका विधवेची असो नाहीतर प्रेयसीची, जयाच्या वाट्याला फार थोडी होळी दृश्यं आली. अमिताभ-रेखाचे तथाकथित प्रेमसंबंध जोरदार चर्चेत असताना १९८१ मध्ये यश चोप्राचा *सिलसिला* प्रदर्शित झाला. त्यावेळी सिनेपत्रकार जोमाने गॉसिप्स लिहीत, तर रंगेल रसिकांना पडद्यावर होळीच्या गाण्याची प्रतीक्षा असायची. अमिताभ-जया आणि रेखा या त्रिकुटासंबंधी लोकांची उत्सुकता यशजींनी चांगलीच ताणून धरली होती.

शिव-हरीच्या संगीतात खुद्द अमिताभनेच आपल्या खर्जातल्या आवाजात एक गीत गायलं होतं 'रंग बरसे भीगे चुनरवाली रंग बरसे...' या गाण्यात एखादी अप्रिय घटना घडू नये म्हणून यशजींनी खूप काळजी घेतली होती आणि सुदैवाने तसं काही झालंही नाही. मात्र यातही प्रेमाच्या रंगांची उधळण केली ती अमिताभ-रेखाने. काही असो, गाणं खूप छान झालं होतं. जयाच्या चेहऱ्यावरचा संयम खूप बोलका होता. जयाच्या तुलनेत आशा पारेखला किती अवघड वाटलं असेल? *कटी पतंग*मध्ये तिला विधवेच्या भूमिकेत दाखवून एक होळीगीत सादर केलं गेलं होतं. गाण्याचे बोल होते—

ओ बबुआ होली है
आज ना छोडेंगे बस हमजोली

खेलेंगे हम होली... आणि असे शब्दांचे खेळ करणारं गीत असताना भरतनाट्यम शिकलेल्या आशा पारेखला नृत्याची संधी दिली गेली नाही तेव्हा तिच्या मनाचं काय झालं असेल याचा विचार करा. पण प्रत्येक कलाकाराला आपल्या भूमिकेच्या मर्यादेत राहावंच लागतं.

ज्याची इमेज कायम ॲक्शन हीरो किंवा हीमॅनची राहिली त्या धर्मेंद्रला नृत्याच्या तालावर थिरकायला सांगितलं तर त्याचं काय होईल? आपण नृत्यात कमी पडतो हे धर्मेंद्र स्वतःही चांगलं ओळखून होता. पण दैवाचा खेळ पाहा, त्याला कितीतरी होळीगीतं मिळाली.

धरमला रातोरात स्टार बनवणाऱ्या ओ.पी. रल्हनच्या *फूल और पत्थर* चित्रपटाचंच उदाहरण घ्या. योगायोगाने यात ट्रॅजेडी किंग मीनाकुमारीचीही भूमिका एका विधवेची होती. गावात एक भयंकर रोगाची साथ पसरल्याने एकाकी पडलेल्या शांतीवर तिच्या दिराची वाकडी नजर पडते. त्याच्या कचाट्यातून शांतीला शाका सोडवतो आणि आपल्या घरी आणून ठेवतो. यात दिग्दर्शकाने खुबीने एक होळीगीत पेरलं. रवीच्या संगीतातलं हे गीत आशा भोसलेने कोरसबरोबर गायलं होतं. त्याचे बोल आहेत:

नोंदः शोमन राज कपूर दरवर्षी सिनेसृष्टीतील मित्रांना बोलावून होळी साजरी करायचे. त्याच्या मृत्यूनंतर अमिताभ, शाहरूख यांनी एक-दोन वर्ष होळीचा उत्सव साजरा केल्यावर सिनेसृष्टीतील होळीचा सिलसिला थांबला. या सिनेकलाकारांकडे होळी साजरी व्हायची तेव्हाच्या काही रंगीबेरंगी दृश्यांची ही झलक.

होली है... लाई है हजारों रंग होली
कोई तन के लिये, कोई मन के लिये...

यात धर्मेंद्र गुंडाच्या भूमिकेत तोही दारूची बाटली हातात घेऊन नाचताना दाखवला होता. आता दारूच्या नशेत कुठला ताल आणि बेताल. *शोले*तल्या होळीगीतातही त्याच्या हातात बाटली दिसते याला विचित्र योगायोग म्हणता येईल.

आणखी एक होली गीत *जलजला* (१९८८) मधलं होतं. यातही नायक होता धर्मेंद्र. इथे धरमजींबरोबर शत्रुघ्न सिन्हा (तोही तालाच्या बाबतीत बेताल) आणि राजीव कपूर होते. या चित्रपटात आर.डी. बर्मननी संगीत दिलं होतं. आणि अनुराधा पटेल, सुदेश भोसले, शैलेंद्र आणि कोरसने गायलेलं एक गीत होतंः

ओ आज मुझे मेरा यार मिल गया
होली आयी रे...

*सिलसिला*प्रमाणेच अमिताभवर आणखी एक होळीगीत चित्रित करण्यात आलं होतं. तो काळ राजेश खन्नाचा होता. हृषिकेष मुखर्जींच्या *नमकहराम*मध्ये राजेश खन्ना-रेखा-अमिताभ आणि सिम्मी हे कलाकार होते. इथेही आर.डीं.चंच संगीत होतं. अमिताभ एका मिल मालकाचा मुलगा असतो तर राजेश खन्ना त्याचा मित्र आणि त्याच्याच गिरणीत काम करणारा एक सामान्य कामगार. यात एक गाणं होतंः

होली है हो सा रा रा...
होली के अंगना में रस बरसत है...

भारतीय संगीतात वसंत, वर्षा (मल्हार), श्रावण (विरह) प्रमाणेच होरी आणि फागुनवरही रागरागिणी आहेत. ग आणि नी कोमल आहेत अशा काफी रागात होरीची पदं गायली जातात. चित्रपटांत हे लक्षात ठेवलं जात नाही. तरीही काही ठिकाणी अपवाद आढळतात. अनुप जलोटाच्या स्वरातील कधी कबीराचं 'चदरिया झिनी रे झिनी...' हे भजन ऐकलंय? तुमच्या लक्षात येईल की हे भजन देस रागातलं आहे. आणि त्यात इतर रागांच्या छटा आहेत हे समजावण्यासाठी अनुपजी राग काफीमध्ये होरी छेडतात.

इत से आये कंवर राधिका
उत से कंवर कन्हाई
खेलत फाग परस्पर हिलमिल
शोभा बरनी न जाई
कैसी ये धून मचाई
ब्रिज में होरी रचाई...

शास्त्रीय संगीताच्या या पारंपरिक पदाचा उपयोग पंडित रविशंकरनी आपल्या एका चित्रपटात कलात्मक पद्धतीने केला. हिंदी भाषेचे प्रसिद्ध कथाकार प्रेमचंदजी यांच्या गोधन या कथेवर आधारित त्याच शीर्षकाचा एक चित्रपट आला होता *गोदान* (१९६३). त्यात राजकुमार, कामिनी कौशल, मेहमूद, शोभा खोटे वगैरे कलाकार होते. संगीत पं. रविशंकर यांचं होतं. पंडितजींनी यात दिलेलं पारंपरिक होरीगीत होतंः होरी खेलत नंदलाल बिरज में... इथेही एक ट्रॅजेडी होतीच. संवादफेकीत उस्ताद मानला जाणारा राजकुमार चांगलं नृत्य करू शकत नसे. म्हणून मग हे सुंदर गीत मेहमूदवर चित्रित करण्यात आलं.

आणि हा फिल्मी होळीगीतांचा लेख मेहबूब खानच्या *मदर इंडिया*मधील गीताचा उल्लेख केल्याशिवाय कसा पुरा होईल? आपल्या आईच्या हातातले कंगन सावकाराकडे गहाण पडले आहेत ही गोष्ट बिरजूला खटकत असते. बिरजूला चिडवण्याच्या हेतूने सावकाराची मुलगी तेच घालून होळी उत्सवात सहभागी होते आणि सारखे ते बिरजूच्या डोळ्यासमोर नाचवते. गाण्याचे शब्द असे होते...

होरी आई रे कन्हाई रंग छलके
सुना दे जरा बांसुरी...

एकीकडे आनंदोत्सव चालू असतो, पिचकाऱ्या उडत असतात तर दुसरीकडे बिरजूच्या जीवाची लाहीलाही होत असते. हा विरोधाभास इतका छान चित्रित केला गेलाय की त्याचं शब्दांत वर्णन करणं कठीण. कथेच्या प्रवाहात हे होळीगीत महत्त्वाचा टप्पा होता ही आणखी एक लक्षात घेण्याची गोष्ट. बाकीही हिंदी चित्रपट *भूख*, *ईलाका*, *खूनखराबा*, *किसमें कितना है दम*, *सस्ता खून महंगा प्यार*...सारख्या कितीतरी चित्रपटांत होळीगीतं होती. पण ती विशेष दखलपात्र ठरली नाहीत.

□ अजित पोपट


करिना, रणधीर आणि करिश्मा कपूर


करिश्मा कपूर - सलमान खानः प्रीतीच्या रंगात रंगले


अमिताभ-जया आणि मास्टर मयूर

*सिलसिला*मध्ये अमिताभ-रेखा

